LIVE महाराष्ट्र 24

महाराष्ट्राचे निर्भीड, निःपक्ष आणि विश्वासार्ह दैनिक वृत्तपत्र • सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारिता

महाराष्ट्र मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६

तंत्रज्ञान व करिअर

स्वप्नांना मिळाले पांढऱ्या कोटाचे बळ; 101 विद्यार्थी बनले डॉक्टर!

सावकार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचा दिमाखदार पदवीदान सोहळा

LIVE MAHARASHTRA 24 | मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६



स्वप्नांना मिळाले पांढऱ्या कोटाचे बळ; १०१ विद्यार्थी बनले डॉक्टर!

सावकार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचा दिमाखदार पदवीदान सोहळासातारा : प्रतिनिधीज्ञान, जिद्द, मेहनत आणि सेवाभावाच्या जोरावर सावकार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या १०१ विद्यार्थ्यांनी डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले. महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. २०२० ते २०२६ या कालावधीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून बी.एच.एम.एस. पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.वैद्यकीय शिक्षणाचा प्रवास यशस्वीपणे पूर्ण करून रुग्णसेवेच्या नव्या पर्वात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा सोहळा आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला. महाविद्यालयाच्या ४९ व्या बॅचने पदवी प्राप्त करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे अकॅडमिक कौन्सिल इन्चार्ज डॉ. सुनील बन्ने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सेक्रेटरी निशांत गवळी, संचालक डॉ. रवी भोसले, प्राचार्य डॉ. मनीष इनामदार, सावकार आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. मुशर्रफ सय्यद, सावकार फार्मसी कॉलेजचे प्राचार्य वसंत लोखंडे तसेच सावकार इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शरद मुळीक यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पदवी मिळविणे हा केवळ शैक्षणिक प्रवासाचा शेवट नसून समाजाच्या आरोग्यसेवेत योगदान देण्याची नवी सुरुवात आहे. रुग्णसेवेचा वसा जपत ज्ञान, कौशल्य आणि संवेदनशीलतेच्या बळावर समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.१०१ नवोदित डॉक्टरांच्या यशामुळे सावकार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक गौरवास्पद अध्याय जोडला गेला.

जलद वार्ता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर सह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ताज्या घडामोडी सर्वात आधी LIVE महाराष्ट्र २४ वर

आपत्कालीन हेल्पलाईन: पोलीस ११२ • रुग्णवाहिका १०८ • अग्निशामक १०१ महिला १०९१ • बाल १०९८

A4 DIGITAL E-PAPER FORMAT

संपर्क / जाहिरात: 9763477700 Developed with ❤ by Kliqueit